# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date: 18 November 2024
## Time: 7.10 to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १८ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

***ठळक बातम्या***

- **राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार–मतदान प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणा सज्ज**
- **आरोप–प्रत्यारोपांच्या फैरींसह प्रचार शीगेला–मतदारांच्या थेट गाठीभेटींवर उमेदवारांचा भर**
- **इफ्फीच्या आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी आशुतोष गोवारीकर यांची निवड**

**आणि**

- **आशियाई चषक हॉकी स्पर्धेत जपानला हरवत भारतीय महिला संघाची उपांत्य फेरीत धडक**

***सविस्तर बातम्या***

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार आहे. येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान होणार असून, ३६३ महिला उमेदवारांसह एकूण चार हजार १३६ उमेदवारांचं भवितव्य इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात बंद होणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात अहेरी मतदार संघातल्या अतिसंवेदशील असलेल्या मतदान केंद्रांवर मतदान यंत्र आणि इतर साहित्यासह हेलिकॉप्टरद्धारे मतदान पथकं काल रवाना करण्यात आली. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून, सर्व मतदारांनी मतदान करण्याचं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

****

प्रचाराची मुदत संपत असतांनाच, राजकीय पक्षांचे नेते आणि उमेदवारांमध्ये आरोप प्रत्यारोप अधिक तीव्र होत असल्याचं दिसून येत आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काल नागपूरजवळ उमरेड इथं प्रचारसभा घेतली. पंडित जवाहरलाल नेहरू आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या नेत्यांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य वेचलं, पण, भारतीय जनता पक्षाने देशात फूट पाडण्याचं काम केलं, अशी टीका त्यांनी केली.

काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी यांनी काल गडचिरोली इथं प्रचारसभा घेतली. महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. त्यानंतर नागपूर इथं काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांच्या प्रचारार्थ काढलेल्या रोड शोमध्ये प्रियंका गांधी सहभागी झाल्या.

महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा काल मुंबईत झाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलताना, महाविकास आघाडीचं सरकार आल्यास, सोयाबीनला सात हजार रुपये भाव दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही दिली. शेतकरी कर्जमुक्ती यासह जाहीरनाम्यात असलेल्या आश्वासनांचा त्यांनी पुनरुच्चार केला. काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड, खासदार संजय राऊत यावेळी उपस्थित होते.

****

केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी काल नागपूर इथं पत्रकार परिषद घेतली, केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकारने राज्यात केलेल्या विकासकामांमुळे मतदार नक्कीच महायुतीच्या बाजूने उभा राहील, असं चौहान म्हणाले.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी अकोला इथं, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी चंद्रपूर जिल्ह्यात बल्लारपूर इथं, तर मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं मतदारांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नंदुरबार जिल्ह्यात धडगाव इथं, तसंच धुळे जिल्ह्यात साक्री मतदारसंघातल्या दहिवेल इथं सभा घेतली. भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात रोड-शो केला, त्यानंतर त्यांनी दुपारी चांदवड इथं प्रचारसभा घेतली.

****

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उत्तर प्रदेशाच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी काल पुण्यात प्रचार सभा घेतली. स्वबळावर सरकार आणण्याचा बसपचा प्रयत्न आहे, परंतू, योग्य संख्याबळ आलं नाही तर सरकार स्थापन करणाऱ्या पक्षाला समर्थन देवून आणि सरकारमध्ये सहभागी होवून लोकांना न्याय देवू, असं आश्वासन मायावती यांनी यावेळी दिलं.

****

जाहीर सभा आणि रोड शो सोबतच पदयात्रा आणि मतदारांच्या गृहभेटी घेण्यावर उमेदवारांचा कल दिसून येतो आहे.

जालना जिल्ह्यात भाजप महायुतीचे भोकरदनचे उमेदवार संतोष दानवे यांनी काल वालसा वडाळा, डोनगाव, निवडुंगा, पोखरी बुटखेडा इथं प्रचार सभा घेतलीं. जालना विधानसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ काल जालना शहरातल्या विविध भागातून प्रचार फेरी काढण्यात आली. जालना इथं माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांच्यासाठी मेळावा घेतला. तर घनसावंगी विधानसभा मतदारसंघातले राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार राजेश टोपे यांनी काल मतदार संघातल्या नालेवाडी, शहागड, वाळकेश्वर, अंतरावाली सराटीसह मतदार संघातल्या विविध गावात प्रचार दौरा करून मतदारांशी संवाद साधला.

****

येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेते सुबोध भावे यांनी केलं आहे.

***Byte…***

****

सोयाबीनला देशात सर्वाधिक पाच हजार रुपये प्रतिक्विंटल उच्चांकी हमीभाव महाराष्ट्रात सत्तेत असतानाच मिळाला असून, ओलाव्याची अट १२ वरुन १५ टक्के केली असल्याचं, राज्य कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल नागपूर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. काँग्रेसचे नेते राणदीप सुरजेवाला यांनी सोयाबीनच्या हमीभावाबाबत दिलेली माहिती चुकीची असल्याचं पाशा पटेल म्हणाले.

****

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत**

****

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ साठी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता आशुतोष गोवारीकर यांची निवड करण्यात आली आहे. गोवारीकर यांनी या नियुक्तीबाबत आनंद व्यक्त केला असून, काळानुसार विकसित होणारा सिनेमा पाहण्यासाठी या महोत्सवापेक्षा दुसरी चांगली संधी नाही असं म्हटलं आहे. हा महोत्सव २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात आला आहे.

****

महिलांच्या आशियाई चषक हॉकी स्पर्धेत काल भारताने जपानवर तीन – शून्य अशी मात करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. बिहारमध्ये राजगीर इथं हा सामना झाला. भारताच्या नवनीत कौर आणि दीपिका कुमारी यांनी उत्कृष्ट खेळ करत विजय मिळवून दिला. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मंगळवारी भारताची लढत पुन्हा जपानशी होणार आहे.

****

दूरदर्शन समाचारचे माजी महासंचालक एस एम खान यांचं काल नवी दिल्लीत निधन झालं, ते ६७ वर्षांचे होते. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांचे प्रेस सचिव म्हणूनही त्यांनी काम पाहिलं होतं.

****

विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

परभणी जिल्हाधिकारी कार्यालय आणि मतदान जनजागृती विभाग तसंच परभणी जिल्हा सायकल संघटनांच्या वतीनं काल शहरात सायकल फेरी काढण्यात आली. प्रारंभी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या उपस्थितीत सर्वांना मतदान करण्यासंदर्भात शपथ देण्यात आली. समारोपात सहभागी सायकलपटूंना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं. या रॅलीत ८ वर्षापासून ते ६० वर्षांपर्यंत सायकलस्वार सहभागी झाले होते.

धाराशिव इथं राष्ट्रीय सेवा योजना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप–परिसरातल्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने काल शहरात मतदान जागृतीपर पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली.

****

विधानसभा निवडणुकीचा प्रचार थांबल्यानंतर मतदानापर्यंतच्या ७२ तासांत कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत, काल छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. अखेरच्या ७२ तासांत वाहनांची तपासणी, छुप्या पद्धतीने केले जाणारे प्रचार, मतदारांना प्रलोभन दाखवण्याचे प्रकार, त्यासाठी केले जाणारे प्रयत्न, अशा घटनांची तात्काळ दखल घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या.

****

नांदेड जिल्ह्यात देखील सर्वत्र चोख बंदोबस्त करण्यात आला असून, निर्भय आणि पारदर्शी वातावरणात मोठ्या संख्येनं नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यातल्या चिखली फाट्यावर 'स्थिर निगराणी' पथकाने एका खासगी बसमधून जवळपास ९० लाख रुपये रक्कम जप्त केली. ही बस मुंबईहून नांदेडकडे जात होती.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या २३ खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांना निलंबित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी लागणाऱ्या मनुष्यबळासाठी मागवलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे, प्रथम संबंधित मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल करण्यात आले, तर आता निलंबनाचे आदेश देण्यात आले आहेत

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदारसंघात ४०४ ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांनी गृह मतदानाचा हक्क बजावला. मतदारसंघात ९५ टक्के गृह मतदान झालं. तर औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघात १७६ जणांनी गृह मतदान केलं असून, हे प्रमाण ९६ टक्के इतकं आहे.

धाराशिव जिल्ह्यात परांडा विधानसभा मतदारसंघात गृहमतदान सुरु असून, पहिल्या दिवशी ४३७ ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आजपर्यंत हे मतदान चालणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यात एकूण ३ हजार ८८ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. जिल्ह्यामध्ये प्रत्येकी नऊ महिला संचलित मतदान केंद्र, दिव्यांग अधिकारी असलेले मतदान केंद्र, युवा मतदान केंद्र आहेत. जिल्ह्यात किनवट मधील पांगरपाड, हदगाव मधील चोरंबा, भोकर मधील पाकी तांडा, देगलूर मधील रामतीर्थ आणि मुखेड मधील कोलेगाव हे पाच संवेदनशील केंद्र असून, या ठिकाणी केंद्रीय राखीव दलाचे कर्मचारी तैनात केले आहेत.

****